नियमित खटला क्र.३०३०१३०/२००२
शासन वि. विश्वास
नि.क्र. १२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ – जप्ती पंच**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नांव | – | विशाल पांडुरंगजी मानापुरे, |
| वय | – | ५३ वर्ष, |
| धंदा | – | व्यवसाय |
| राहणार | – | महाल, नागपूर. |

**<u>सरतपासणी–सहाय्यक सरकारी वकील ममता आवारीवार यांचेमार्फत शपथेवर सुरु:</u> –**

**१.** हे मला आठवत नाही की, मला दिनांक ०८.०८.२००२ रोजी पोलीसांनी पंचनाम्याकामी पंच म्हणुन काम पाहण्यास बोलावले होते किंवा कसे. आता मला दिनांक ०८.०८.२००२ रोजीचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला त्यावर माझी अनुक्रमांक २ वर माझी सही असुन त्यामधील मजकुराबाबत मला काहीएक कल्पना नाही. सहीपुरता **नि.क्र.पी–१३/पीडब्ल्यु.१** देण्यात येते.

**(सरकारी वकीलांनी साक्षीदार हा त्याचे पूर्वीच्या जबाबाच्या विपरीत साक्ष देत असल्याने व सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याने साक्षीदाराची भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उलट तपासाची परवानगी मागितली. परवानगी दिली).**

**२.** आता मला ०८.०८.२००२ रोजीच्या जप्तीपंचनाम्यातील अधोरेखीत भाग अ वाचुन दाखवण्यात आला. त्यामधे नमुद केल्याप्रमाणे कोणताही मुददेमाल माझयासमक्ष जप्त करण्यात आला नाही. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

आरोपीतर्फे उलटतपास काही नाही.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.01.05 17:02:11 +0530

नागपूर. (कौस्तुभ नागेश मराठे)

दि.०५/०१/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.

कोर्ट क्र.१